# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. ४०२२०१, फोन नं. ०२१४१-२२२०१६, फॅक्स नं. ०२१४१-२२२२१६

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


**पत्र**

विषयः- **वन जमिन रायगड**

मौजे विंधणे, ता. उरण, जि. रायगड राखीव वन स.नं. 195/3 मे. पी.पी.खारपाटील कन्ट्रक्शन प्रा.लि. मु.पो.चिरनेर, ता. उरण, जि. रायगड

जावक क्र. ब/20/जमिन/ 4140 अ /2016-17.

अलिबाग – 402 201, दिनांकः- 15/12/2016

प्रति,

श्री. सागर खारपाटील,
मे.पी.पी.खारपाटील कन्ट्रक्शन प्रा.लि.
मु.पो.चिरनेर, ता. उरण, जि. रायगड.

संदर्भः- 1) आपलेकडील दिनांक 27/09/2016 रोजीचे पत्र.
2) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/3324, दिनांक 18/10/2016.
3) आपलेकडील दिनांक 17/11/2016 रोजीचे पत्र.

आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये मौजे विंधणे सर्व्हे नंबर 221 व मौजे चिरनेर या गावांतील सर्व्हे नंबर 268, 269 मधून जोडरस्ता व 6" व्यासाची जी.आर भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक केबल टाकरणेकरीता वनजमिन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास एक प्रतीत सादर केला होता. सदर प्रस्तावांत असणा-या त्रुटी आपणास या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये कळविल्या होत्या. त्यानुसार आपणाकडून संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव अहवाल या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे. तथापी सदर प्रस्तावाची छाननी केली असता अद्यापही त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1) प्रस्तावामध्ये उप अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडील सर्व्हे क्रमांक 195/3 चे पोट ~~हिस्सा~~ हिस्सा दर्शविणारा गट बुक नकाशा उपलब्ध करुन देण्यात यावा.
2) प्रस्तावांतील मागणी केलेल्या वन क्षेत्रामध्ये वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत विहित प्रपत्रांतील जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क अधिनियम, 2006 अंतर्गतचे प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर 7 प्रतीत या कार्यालयास फेर सादर करावा.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग.